महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ◆९ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसची धडपड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्त आहे. या दोन्ही पदांसाठी महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट यांच्यामध्ये चढाओढ सुरू आहे. त्यामुळे विधान परिषदेमध्ये काँग्रेसकडून दावा करण्यात आला आहे, तर विधानसभेमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून दावा करण्यात आला आहे. आज काँग्रेस नेत्यांनी मातोश्रीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आणि विविध मुद्यांवर चर्चा केली. या भेटीमध्ये विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदासह राज ठाकरे यांच्या संभाव्य महाविकास आघाडीतील एन्ट्रीवरही चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. त्याचबरोबर आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीसंदर्भातही उभय पक्षांच्या नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. दरम्यान, या बैठकीमध्ये उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या एकत्र येण्यावर काँग्रेस नेत्यांसोबत चर्चा केल्याची माहिती आहे.

विधिमंडळात पहिल्यांदाच सद्यस्थितीत विरोधी पक्षनेते पद ना विधानसभेत आहे ना विधान परिषदेत आहे. त्यामुळे तातडीने विरोधी पक्षनेते पद देण्यात यावे अशी मागणी विरोधकांची आहे. विधानसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी ठाकरेंच्या शिवसेनेने दावा केला आहे. आता विधान परिषद विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसकडून दावा केला जाणार आहे.







■ मातोश्रीवर बैठक ■ सतेज पाटलांच्या नावाची चर्चा

### मनसेला सोबत घेण्यासंदर्भात चर्चा झाली?

दुसरीकडे,आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याचे संकेत या आधीच दोन्ही पक्षांकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे राज ठाकरे यांना सोबत घेण्यास संदर्भात उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस नेत्यांसोबत चर्चा केल्याची माहिती आहे. मात्र, राज ठाकरे यांना सोबत घेण्यासंदर्भात राज्यातील काँग्रेसचे नेते दिल्लीतील पक्षश्रेष्ठींसोबत चर्चा करतील आणि त्यानंतर राज्यातील काँग्रेस नेते राज ठाकरेंना सोबत घेण्यासंदर्भात भूमिका स्पष्ट करतील.

### आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात चर्चा

दुसरीकडे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काँग्रेस नेते आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. महाविकास आघाडीतील पक्ष म्हणून ठाकरेंची शिवसेना आणि काँग्रेस दोन्हीही पक्ष स्थानिक पातळीवर तयारी करत आहेत. स्थानिक पातळीवर समीकरणे आणि पदाधिकारी आणि स्थानिक नेत्यांचा विचार करून आघाडी संदर्भात निर्णय घेतला जाणार आहे.

### महाविकास आघाडीमधील राजकीय समीकरण

- विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद अंबादास दानवे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने रिक्त आहे
- सध्या विधान परिषदेत महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस संख्याबळ अधिक आहे. त्यामुळे विधान परिषद विरोधी पक्षनेतेपदावर काँग्रेस पक्षाने दावा केला आहे.
- विधान परिषदेत ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा, काँग्रेस पक्षाचे आठ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दोन आमदार आहेत.
- विधान परिषद विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे असावं यासाठी काँग्रेस नेत्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा केली. विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसकडून सतेज पाटील यांचं नाव चर्चेत आहे.

## थोडक्यात बातम्या

## केडीएमसीच्या नोकर भरतीसाठी आजपासून परीक्षा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली पालिकेतील २१ संवर्गातील ४९० पदांसाठी सरळ सेवेने नोकर भरती करण्यात येणार आहे. या नोकर भरतीसाठी पालिकेच्या समन्वयाने टीसीएस कंपनीकडून एक लेखी परीक्षा ९ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर या कालावधीत घेण्यात येणार आहे. ही परीक्षा राज्यातील १४ जिल्ह्यांमधील २५ परीक्षा केंद्रावर ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी पालिकेचे ४२ समन्वयक आणि निरीक्षक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.आयुक्त अभिनव गोयल यांच्या प्रमख मार्गदर्शनाखाली परीक्षेत मुख्य समन्वय अधिकारी म्हणून अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड काम पाहणार आहेत. गोयल यांच्या निर्देशाप्रमाणे ४२ समन्वयक अधिकारी आणि निरीक्षक या परीक्षा केंद्रावर नियुक्त करण्यात आले आहेत.

दत्तात्रय पाटील, गजानन पाटील, जितेंद्र सोनावणे, संतोष धांडे, राहुल म्हात्रे, जितेंद्र पाटील, ज्ञानेश्वर आडके, आदिनाथ पोखरकर, अवधूत मदन, दिलीप शिंदे, तुषार साठे, अजय सुळेभावीकर, राजेंद्र वसईकर, उदय सूर्यवंशी, देवंदरएकांडे असे २९ अधिकारी निरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

### तीन सत्रांत परीक्षा

परीक्षा केंद्रावर सकाळी ९ ते दुपारी ११, दुपारी १ ते दुपारी ३ आणि संध्याकाळी ५ ते संध्याकाळ ७ या वेळेत अशा तीन सत्रांत ही परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी राज्याच्या विविध भागांतून एकूण सुमारे ५५ हजारांहून अधिक इच्छुक उमेदवारांनी अर्ज केले आहेत.

## ओमी कलानी यांच्या हाती शिंदे गटाचे शिवधनुष्य ?



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगरच्या राजकारणात निवडणुकीच्या उंबरठ्यावर एक नाट्यमय घडामोड घडली आहे. दीर्घकाळ दिशाहीन भटकंतीनंतर अखेर टीओके नेता ओमी कलानी यांनी शिवसेना शिंदे गटाचा हात धरला आणि या अनपेक्षित कराराने उल्हासनगर शहराच्या राजकीय पटावर खळबळ उडवली. महायुतीतील समीकरणांना तडा देणारी ही हातमिळवणी कुणासाठी वरदान ठरणार आणि कुणासाठी ओझं, हे येणारा काळच सांगेल.शनिवारी झालेल्या एका अनपेक्षित कराराने उल्हासनगरच्या राजकारणात वादळ निर्माण केले. राजकीय आधाराच्या शोधात भटकणाऱ्या टीम ओमी कलानीचे प्रमुख नेते ओमी कलानी आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांना अखेर शिवसेना शिंदे गटाने आपल्यासोबत युतीमध्ये सामावून घेतले. या "दोस्तीच्या गठबंधनाने" स्थानिक विरोधकांपुढे नवे आव्हान उभे केले आहे. उल्हासनगरसारख्या संवेदनशील राजकीय पटावर या कराराचा किती परिणाम होईल, हे अद्याप अनिश्चित आहे.

## गणेशोत्सवात टीएमटीचे ४० लाखांचे नुकसान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणेकरांना उत्तम दर्जेदार पर्यावरणपूरक व गारेगार प्रवास देण्याचा प्रयत्न ठाणे पालिकेच्या परिवहन सेवेकडून करण्यात येत आहे; मात्र गणेशोत्सवानिमित्त कोकणात व गावी गेलेल्या नागरिकांमुळे त्याचा परिणाम थेट टीएमटीच्या उत्पन्नावर झाल्याचे दिसून येत आहे. गणेशोत्सवाच्या काळात दिवसाकाठी चार ते पाच लाखांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागत होते. मागील १० दिवसांत सुमारे ४० ते ४५ लाखांचा फटका ठाणे परिवहन सेवेला सहन करावा लागल्याचे दिसून आले आहे.

ठाणेकरांना उत्तम प्रवास व अधिक वेगवान प्रवास देण्यासाठी टीएमटीकडून मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येत आहे. त्यात शहरातील महत्त्वाच्या व वर्दळीच्या मार्गावर जास्तीत जास्त बस सोडून अधिकाधिक उत्पन्न मिळविण्यासाठी टीएमटीकडून नियोजन आखले जात आहे. अशातच सण उत्सवाच्या काळातदेखील ठाणेकर नागरिकांना व प्रवाशांना अधिकाधिक चांगली वाहतूक सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी ठाणे परिवहन सेवेने प्रयत्न केले होते; मात्र गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात नागरिक हे कोकणात व गावी गेल्याने त्याचा परिणाम टीएमटीच्या उत्पनावरही झाल्याचे दिसून आले.इतर दिवशी ठाणे परिवहन सेवेचे उत्पन्न हे साधारण २८ ते २७ लाखांच्या घरात असते, मात्र गणेशोत्सवाच्या काळात हे उत्पन्न सरासरी २५ ते २४ लाखांच्या खाली गेल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. याचा फटका ठाणे परिवहन सेवेला बसला आहे. गणेशोत्सवाच्या १० दिवसांत ठाणे परिवहन सेवेला सुमारे ४० ते ४५ लाखांचा फटका सहन करावा लागला. बुधवारी २७ ऑगस्टला गणेश चतुर्थीच्या दिवशी २४ लाख ७८ हजार ५९४ रुपये, तर अनंत चतुर्दशीच्या दिवशी ६ सप्टेंबरला ठाणे परिवहन सेवेचे उत्पन्न हे २३ लाख ८९ हजार होते, तर ५ सप्टेंबरला ईद निमित्ताने सुट्टी असल्याने या दिवशी उत्पन्न २४ लाख ६७ हजार २८९ इतके होते. ७ सप्टेंबरला रविवार असल्याने परिवहनच्या तिजोरीत आणखीन घट होऊन २२ लाख ९३ हजार रुपये इतके उत्पन्न जमा झाले होते.

## विद्यार्थ्यांच्या अपार आयडीसाठी २० सप्टेंबरची डेडलाईन

● मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या सूचना ● शिक्षकांमध्ये संताप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : यंदा शाळा, शिक्षक व विद्यार्थ्यांची माहिती २० सप्टेंबरपर्यंत यु डायस प्लस या पोर्टलवर भरण्यात यावी, अशा सूचना मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून सर्व शाळांना दिले आहेत. एकीकडे विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी ३० सप्टेंबर मुदत दिली असताना शिक्षण उपसंचालकांनी काढलेल्या या आदेशामुळे शिक्षकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

यु डायस पोर्टलमध्ये शाळा, शिक्षक व विद्यार्थ्यांची स्वतंत्र माहिती भरावी लागते. शिक्षकांना त्यांचे दैनंदिन शिक्षणाचे काम करून ही काम करावे लागते. यामध्येही शाळा पोर्टलची माहिती भरताना शाळा व्यवस्थापन प्रकार, माध्यम, शाळेत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, शाळा आराखडा, आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह, विद्यार्थ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी, इको क्लबची स्थापन याबाबत सर्व माहिती सविस्तर भरावी लागते. त्याचप्रमाणे शिक्षक पोर्टलमध्ये शाळेतील सर्व शिक्षकांची माहिती भरणे तसेच त्यांचे आधार अद्ययावत करून घ्यावे लागते. तसेच शाळेच्या लॉगिनमधून विद्यार्थी पोर्टलमध्ये शाळेतील एकही विद्यार्थी अर्धवट स्थितीत राहू नये तसेच सर्व विद्यार्थ्यांची खातरजमा करावी.

शाळेतील एकही विद्यार्थी यु-डायस प्लस प्रणालीमध्ये नोंद करावयाचा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. ड्रापबॉक्स शुन्य असल्याची खात्री करून सर्व विद्यार्थ्यांचे आधार १०० टक्के अद्ययावत करून त्यांचे अपार आयडी तयार करून घेण्याच्या सूचना मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ यांनी सर्व शाळांना दिल्या आहेत.

## प्रस्तावित मेट्रो मार्गिकेत अंबरनाथला हवी दोन स्थानके

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथमधील प्रस्तावित मेट्रो मार्गिकत कानसई आणि महात्मा गांधी विद्यालयासमोर मेट्रो स्थानकाची उभारणी करावी, तसेच महात्मा शाळेजवळील स्थानकाला श्री क्षेत्र प्राचीन शिवमंदिर मेट्रो स्टेशन असे नाव द्यावे, अशी मागणी माजी नियोजन समिती सभापती कुणाल भोईर यांनी खासदार डॉ. श्रीकांत रिदि यांच्याकडे केली आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत एमएमआरडीए आयुक्त संजय मुखर्जी आणि अधिकाऱ्यांसमवेत प्रस्तावित मेट्रो प्रकल्पासंदर्भात झालेल्या बैठकीत अंबरनाथच्या स्थानकांबाबत चर्चा झाली. यावेळी दोन्ही स्थानकांबाबतचे निवेदन खासदार शिंदे यांना देण्यात आले. या वेळी वडोळ-कानसई विभागादरम्यान उभारण्यात येत असलेल्या नवीन रेल्वे उड्डाणपुलाजवळ मेट्रो स्थानक उभारून त्याला कानसई गाव मेट्रो स्टेशन नाव द्यावे, अशीही मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे महात्मा गांधी शाळेजवळ स्थानक उभारून त्याला श्री क्षेत्र प्राचीन शिवमंदिर मेट्रो स्टेशन नाव देण्यात यावे. या निर्णयामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल, तसेच वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीच्या गरजा पूर्ण करण्यास मदत होईल, असे भोईर यांनी स्पष्ट केले. खासदार डॉ. शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे दोन्ही स्थानकांचे काम निश्चित होईल, असा विश्वास भोईर यांनी व्यक्त केला.

### अशी असणार मार्गिका

प्रस्तावित मेट्रो मार्गिका क्र. ५ ठाणे-भिवंडी-कल्याण-उल्हासनगर अंबरनाथमार्गे चिखलोलीला जाणार आहे. तर मार्गिका क्र. १४ तळोजा, काटई, नेवाळी, आनंदनगर एमआयडीसी, टी सर्कलमार्गे बदलापूरकडे जाणार आहे. कल्याण-बदलापूर महामार्गाजवळ जीएनपी प्लाझाजवळ मेट्रो स्थानक प्रस्तावित आहे. मार्गिका ५ आणि १४ यांचे एकत्रीकरण केल्यास ठाणे व नवी मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय होईल. यामुळे प्रवासाचा वेळ व खर्च दोन्ही वाचतील.



## जीवनदीप महाविद्यालयामध्ये टिटवाळ्याचा शार्क टँक कार्यक्रम संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



गोवेली : जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे २०२१ मध्ये कोकून नावाचं डिपार्टमेंट ऑफ इक्युबॅशन सेंटर सुरू करण्यात आलं होतं व या विभागाच्या अंतर्गत तरुण व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या नवनवीन व्यावसायिक कल्पनांना व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ खुलं करून देण्यात आलं होतं. यामध्ये सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ देण्याच्या उद्देशाने सदर विभागाची स्थापना करण्यात आली होती. दिनांक ०८- ०९- २०२५ रोजी महाविद्यालयात जीवनदीप संस्था, एम एस एम इ, कोकून इक्युबॅशन सेंटर ,नमन एंजल्स, महाविद्यालयाचा आयटी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात खुल जा सिम सिम टिटवाळा चा शॉर्ट टँक हा अनोखा कार्यक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला व आपली व्यावसायिक कल्पना अनुभवी पॅनल समोर पावर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे विद्यार्थ्यांनी समजून सांगितली. पॅनल मध्ये सदस्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना प्रतिप्रश्न केले तसेच सदर व्यावसायिक कल्पना अधिक उत्कृष्ट कशाप्रकारे करता येईल याकरता मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांचे या कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले. देवरुत जाधव, अक्षय पासलकर, ओमकर मोरे हे प्रमुख मान्यवर सदर कार्यक्रमास लाभले संस्थेचे संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांनी मान्यवरांना शाल, गुलाब पुष्प व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले. मान्यवरांनी सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी भवितव्यासाठी खूप शुभेच्छा दिल्या . सदर कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. वैभव तरे, प्रा. उल्हास गायकर व इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचे या कार्यक्रमास मोलाचे सहकार्य लाभले. प्रा. सतीश लकडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त करत सदर कार्यक्रम संपन्न झाला असे जाहीर केले.






# मुरबाड पंचायत समितीच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : दिनांक ०४/०९/२०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ०३ वाजेपर्यंत MIDC हॉल मुरबाड येथे जिल्हा परिषद ठाणे व पंचायत समिती मुरबाड, ग्रामपंचायत विभागाच्या वतीने " मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत तालुका स्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेस मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे,गटविकास अधिकारी डॉ.लता गायकवाड,सेवालाल राठोड,मोतीराम भोये,लक्ष्मण सुरोशे विस्तार अधिकारी,मा. जि.प.सदस्य उल्हास बांगर, माजी पंचायत समिती सभापती दिपक पवार तसेच सरपंच डॉ. कविता वरे ग्रामपंचायत किसळ यांनी मार्गदर्शन केले.तसेच ग्रामपंचायत अधिकारी विलास मिरकुटे,बाळु कोकणे व प्रकाश कोळी यांनी विषयावर मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाचा उद्देश शाश्वत विकासाची ध्येय यावर काम करणे व ग्रामपंचयातमध्ये विकासाची स्पर्धा लावणे व विविध पुरस्कारांसाठी ग्रामपंचायत पात्र ठरविणे हा होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.लता गायकवाड गटविकास अधिकारी यांनी केले तर सुत्रसंचलन श्रीम. पुनम डोहळे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रल्हाद लोकडे यांनी केले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने तालुक्यतील ग्रामपंचायतींचे सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शासनाचे वरिष्ठ व पर्यवेक्षिय अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

## पत्रकार मारहाण प्रकरण

# पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी

### जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : साम टीव्हीचे पत्रकार विकास मिरगणे यास पार्किंगच्या वादातून मारहाण करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षकावर कारवाई करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना रायगड जिल्हा प्रेस क्लब च्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने नुकतेच निवेदन देण्यात आले.

साम टीव्हीचे पत्रकार व रायगड प्रेस क्लबचे सदस्य विकास मिरगणे हे मुंबई गिरगाव येथे गणेश विसर्जन प्रसंगी वार्तांकन करण्याचे वेळी गाडी पार्किंग करताना तेथे ड्युटीवर असणारे सहाय्यक निरीक्षक शांताराम नाईक यांच्याशी शुल्लक कारणावरून बाचाबाची झाली, यातून पोलीस निरीक्षक शांताराम नाईक याने पत्रकार विकास मिरगणे यांच्या कानाखाली लगावली. या मारहाणीच्या निषेधार्थ व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षक शांताराम नाईक यांचे वर कारवाई करावी यासाठी रायगड जिल्हा प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्याध्यक्ष संजय मोहिते, उपाध्यक्ष मोहन जाधव, पत्रकार हल्ला कृती समितीचे जिल्हा संघटक विजय मोकल, माजी अध्यक्ष भारत रांजणकर, जिल्हा प्रेस क्लबचे संघटक कमलेश ठाकूर,अमोल जैन,गणेश पवार,राजेश भोस्तेकर, ज्ञानेश्वर बागडे व इतर पत्रकार उपस्थित होते.त्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशा दिलेल्या निवेदनात जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे संबंधित निवेदन पाठवणार असल्याचे सांगितले. तर मुबंई येथेही राज्य महासंचालक यांचेकडे मुंबई येथील पत्रकार निवेदन देणार आहेत.

# श्रीसदस्यांकडून दीड टन निर्माल्य जमा

## निर्माल्यापासून होणार खतनिर्मिती





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : वासिंद व वासिंद परिसरातील श्री सदस्यांनी गणेशोत्सवात निर्माण झालेला जवळपास दिड टन निर्माल्य जमा केले असून या निर्माल्य पासून खत निर्मिती बनवून लागवड केलेल्या वृक्षांसाठी वापर करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दरवर्षी कोणताही सण व उत्सव असला की डॉ. श्री नानासाहेब प्रतिष्ठान मार्फत पर्यावरण पूर्वक उपक्रम हाती घेण्यात येत असतात. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गणेशोत्सव दरम्यान सार्वजनिक ठिकाणी पडलेले फुले, पाने, हार, प्लास्टिक यामुळे केवळ घाणीचे साम्राज्य निर्माण होते त्यामुळे परिसरात अतिशय दुर्गंधीयुक्त वातावरण निर्माण होऊन रोगराई पसरण्याची दाट शक्यता असते यासाठी हे सर्व श्री सदस्य हा स्तुत्य उपक्रम हाती घेऊन परिसरातील केरकचरा घाण पानं फुल गोळा करून स्वच्छता निर्माण करत असतात आणि जल प्रदूषण होऊ नये याची काळजी घेतात आणि पर्यावरणाचे रक्षण करतात गणपती विसर्जनानंतर लागलीच डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या माध्यमातून निर्मल्य गोळा करून या निर्माल्यापासून सेंद्रिय खत निर्मितीची प्रकिया राबविली जाते सन 2019 पासून निर्माल्यापासून खत निर्मिती प्रक्रिया दरवर्षी राबविण्यात येते

डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या माध्यमातून तर डॉ. श्री आप्पा साहेब धर्माधिकारी आणि सचिन दादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनातून दर वर्षी प्रमाणे यंदाही येथील श्री सदस्यांनी गणेश उत्सव निमित्त वासिंद, खातिवली, अंबर्जे,आसनगांव, आटगांव, काळजविहिर, खर्डी, कसारा येथील विसर्जन ठिकाणी निर्माल्य जमा केले

या वेळेस प्रतिष्ठान मार्फत एकूण 682 मूर्ती विसर्जन करण्यात आल्या तर यातून जवळपास 1.5 (दिड) टन निर्माल्य जमा करण्यात आले तर या निर्माल्य पासून सेंद्रिय खत निर्मिती करण्यात येणार असून हे खत वासिंद येथील लागवड केलेल्या वृक्षांना वापरण्यात येणार असल्याची माहिती श्री सदस्यांनी दिली आहे.

# श्राद्धविधी : अंधश्रद्धा नाही, तर शास्त्र !

प्रस्तावना : हिंदु धर्मामध्ये पूर्वजांना सद्गती देण्यासाठी श्राद्धविधी सांगितला आहे; पण काही महाभाग कुठल्याही अभ्यासाविना श्राद्धाविषयी अपसमज पसरवतात. उदाहरणार्थ,'श्राद्धविधी ही अंधश्रद्धा असून तो ब्राह्मणांचे पोट भरण्यासाठी सांगितलेला विधी आहे', 'श्राद्धविधी म्हणजे थोतांड आहे', 'श्राद्ध करण्यापेक्षा रुग्णालय किंवा शाळा यांना दान द्या', 'श्राद्ध करण्यापेक्षा जिवंतपणीच आई-वडिलांची काळजी घ्या' आदी. धर्मशिक्षणाच्या अभावामुळे किंवा सनातन परंपरांचे पालन खंडित झाल्यामुळे अनेक जण श्राद्धाविषयी पसरवल्या जाणाऱ्या गैरसमजुतींना बळी पडतात. तसे होऊ नये आणि पितरांच्या सद्गतीसाठी आणि पर्यायाने मनुष्याच्या कल्याणासाठी असणारा शास्त्रोक्त श्राद्धविधी सर्वांनी प्रत्येकाने श्रद्धेने करावा, यासाठी हा लेखप्रपंच !



श्राद्धविधीद्वारे दिवंगत पितरांना ऊर्जा मिळणे : 'देहाचा नाश झाला, तरी जिवाचा नाश होत नाही', 'प्रत्येक व्यक्तीला मृत्यूनंतर त्याच्या त्याच्या कर्मानुसार पुन्हा जन्म मिळतो', हा सिद्धांत हिंदु धर्मात सांगितला आहे. थोडक्यात, 'कर्मफलसिद्धांत' आणि 'पुनर्जन्मसिद्धांत' हिंदु धर्मात प्रतिपादित केले आहेत. कुणी हे सिद्धांत मानो अथवा न मानो, हे सिद्धांत सर्वांना लागू आहेत. यानुसार ज्या पूर्वजांना मृत्योत्तर सद्गती मिळाली नसेल, त्यांना श्राद्ध, तर्पण, पिंडदान आदी विधींच्या माध्यमातून सद्गती मिळण्यासाठीची उर्जा प्राप्त होते. मत्स्यपुराणामध्ये पिंडोदक क्रियेमुळे पितर कसे तृप्त होतात, याचे वर्णन केले आहे. श्राद्धकर्मामध्येही जे पिंडोदक दिले जाते, त्या माध्यमातून दिवंगत पितरांना ते त्यांच्या उचित आहाराच्या रूपात प्राप्त होते. श्राद्धातील मंत्रोच्चारांमध्ये पितरांना गती देण्याची सूक्ष्म शक्ती सामावलेली असते. पितरांना हविर्भाग दिला गेल्याने ते संतुष्ट होतात. श्राद्धामुळे पितरांची त्रासांतून मुक्तता होते. ब्रह्मवैवर्तपुराण सांगते, 'देवकार्यापेक्षा अधिक महत्त्वाचे पितृकार्य आहे'; म्हणूनच सर्व मंगल कार्यांतही नांदी श्राद्धाचे विधान सर्वप्रथम असते.'

भारतातील कुणा व्यक्तीला अमेरिकेतील व्यक्तीला पैसे पाठवायचे असतील, तर बँकेद्वारे रुपया या भारतीय चलनाचे डॉलर या अमेरिकेच्या चलनामध्ये रूपांतर होते. त्याप्रमाणे जो श्राद्ध विधी केला जातो, त्याद्वारे पितरांना ऊर्जा प्राप्त होते.ज्याप्रमाणे वित्तक्षेत्राचा अभ्यास असेल, तर रुपयांचे रूपांतर डॉलरमध्ये कसे केले जाते, हे समजू शकते, त्याप्रमाणे हिंदु धर्माचा अभ्यास असेल, धर्मावर श्रद्धा असेल, तर या विधींमागचे शास्त्र चांगल्या प्रकारे समजू शकते. एखाद्याच्या बँकेच्या खात्यात खूप पैसे असतील, तर इतरांच्या मदतीची आवश्यकता पडणार नाही; पण एखाद्याच्या बँकेत कमी पैसे असतील आणि अन्य कुणी त्याच्या बँकेत पैसे जमा केले, तर त्याच्या खात्याची रक्कम वाढते. त्याप्रमाणे ज्या व्यक्तीची साधना किंवा पुण्यबळ भरपूर असेल, त्यांना मृत्योत्तर सद्गती मिळते; पण ज्यांची साधना किंवा पुण्यबळ कमी असेल, त्यांना अग्नीसंस्कार, श्राद्ध, तर्पण आदी विधींच्या माध्यमातून ऊर्जा मिळते. श्राद्धामध्ये भोजनाचे ताट विशिष्ट प्रकारे वाढणे, पिंडाला कावळा शिवणे, तर्पण करणे या सर्वांच्या मागे शास्त्र आहे. कोणत्याही अभ्यासाविना त्याच्यावर टीका करणे म्हणजे खरे तर स्वतःचेच हसे करून घेण्यासारखे आहे. आज ऑक्सफोर्ड, केंब्रिज आदी विदेशी विद्यापिठांमध्ये संस्कृत, हिंदु धर्म या विषयांवरील 'कोर्स' शिकवले जातात. त्यामुळे श्राद्धावर मनमानी टीका करणाऱ्यांनी थोडा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

श्राद्ध आणि सामाजिक कार्याला दान या भिन्न संकल्पना : काही जण श्राद्ध करण्याऐवजी गरिबांना दान द्या किंवा शाळा, रुग्णालये यांना देणगी द्या, असे आवाहन करतात. असे म्हणणे म्हणजे रोग एक आणि उपचार भलताच ! श्राद्ध आणि सामाजिक कार्याला दान या दोन्ही भिन्न संकल्पना आहेत.श्राद्ध न करता भावनेपोटी दान केले, तर त्याने पितर प्रसन्न होत नाहीत; कारण त्या दानाचे फळ पितरांना मिळत नाही. श्राद्धाच्या माध्यमातून पितरांना अन्न मिळते. भूक शमवण्यासाठी अन्नच खावे लागते. कुणाला तरी देणगी दिली; म्हणून आपले पोट भरत नाही. तसेच श्राद्धाचे आहे. आपल्याला आजार झाला, तर आपल्याला औषध घ्यावे लागते. त्यावर मी देणगी देतो, असे म्हणून चालत नाही. मग आपण आध्यात्मिक दृष्टिकोनातून आजारी असताना त्यावर आध्यात्मिक उपाय करायला नकोत का ? एखाद्याला सामाजिक कार्याला देणगी द्यायची असेल, तर त्याने ती केव्हाही द्यावी; पण देणगी हा श्राद्धाला पर्याय नाही, हे लक्षात घ्यावे.

षडयंत्रकारी भावनिक आवाहनांना भुलू नका : 'श्राद्ध करण्यापेक्षा जिवंतपणीच आई-वडिलांची काळजी घ्या', असे आवाहन करणारे काही भावनिक संदेश पितृपक्षात प्रसारित केले जातात. अशांचा सूरही एकप्रकारे श्राद्ध करू नये, यासाठीचाच असतो; पण हे लक्षात घेतले पाहिजे की, हिंदु धर्माने कधीही आई-वडिलांना वाऱ्यावर सोडा, अशी शिकवण दिलेली नाही. उलट हिंदु संस्कृतीत 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, अतिथी देवो भव', असे म्हटले आहे. याचा अर्थ, आई-वडिल, आचार्य, अतिथी यांना देवाच्या रूपात पहाण्याची शिकवण दिली आहे. जिवंतपणी आई-वडिलांची काळजी घेतली, तर मृत्योत्तर श्राद्ध करण्याची आवश्यकता नाही,असा तर्क लावणेच मूढपणाचे लक्षण आहे. याचे कारण, श्राद्धादी विधी हेच मुळात मृत्योत्तर सद्गती मिळण्यासाठी असतात. एखादा चढ असेल, तर तेथे वाहने काळजीपूर्वक चालवा, अशी पाटी लावलेली असते. कुणी त्या पाटीला अनुसरून 'आधीच वाहने नीट चालवा', असे म्हटले, तर ते अर्थहीन असते. याचे कारण, ती पाटी चढावर गाडी चालवतांना घ्यायच्या काळजीविषयी आहे. त्यामुळे अशा प्रकारे भावनिक विधाने करणे, हा हिंदूंना धर्माचरणापासून परावृत्त करण्याचाच प्रयत्न आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जिवंतपणी आई-वडिलांची सेवा करणे आणि त्यांचा मृत्यू झाल्यानंतर श्राद्धादी विधी करणे, हे मुलांचे कर्तव्य आहे.

रामायणकाळात श्रीरामाने पिता दशरथाच्या मृत्यूची वार्ता समजल्यानंतर यथाकाली श्राद्ध केले होते, असा उल्लेख आहे.राजा भगिरथाने पूर्वजांच्या मुक्तीसाठी अनेक वर्षे कठोर तपश्चर्या करून साक्षात गंगा मातेला पृथ्वीवर आणले आणि त्याच्या पूर्वजांना मुक्त केले. अशा प्रकारे कठोर प्रयत्न करण्यालाच 'भगिरथ' प्रयत्न असे म्हटले, जाते असे आपण ऐकले असेलच. यावरून श्राद्धविधी किती प्राचीन आहे आणि ब्राह्मणांचे पोट भरण्याचा त्यात काही संबंध नाही, हे लक्षात येते. 'शिक्षण घेणे हा शिक्षकांचा पोट भरण्याचा धंदा आहे; म्हणून मी पाल्याला शाळेतच घालणार नाही', असे म्हणणे जेवढे अर्थहीन आहे, तितकेच श्राद्धविधी म्हणजे ब्राह्मणांचा पोट भरण्यासाठी असल्याने आम्ही तो करणार नाही, असे म्हणणे अर्थहीन आहे. ज्याप्रमाणे मुलाने शिक्षण घेतले नाही, तर त्याचीच हानी आहे, त्याप्रमाणे श्राद्धविधी केले नाही, तर त्या कुटुंबाचीच हानी आहे. श्राद्धादी कुलधर्म पाळल्यावरच वंशशुद्धी होणे 'गर्भधारणा झाली की, त्या अर्भकाचा जन्म सुखाने व्हायचा असतो. गर्भातला जिवाचा प्रवेश, त्याची वाढ, गर्भवती मातेची प्रसन्नता आणि सहजसुलभ प्रसुती हे केवळ औषधाने होते का ? त्याकरिता ईश्वरीकृपा हवी असते. विश्व निर्माण करणाऱ्या शक्तीची कृपा हवी. पितर हे वंशरक्षक आहेत; म्हणून शाश्वत असे कुलधर्म, श्राद्धादी धर्म कटाक्षाने सांभाळावे लागतात. कुलधर्म टळले, मातृदोष आणि पितृदोष वाढले, तर त्या कुटुंबाचा विध्वंस होतो. श्राद्धादी कुलधर्म सांभाळले की, वंशशुद्धी अटळ असते. त्याकरिता शाश्वत असे कुलधर्म, श्राद्धादी धर्म पाळले पाहिजेत.

सध्याच्या काळात बहुतेक सर्वच जण पितृदोषाने ग्रस्त : हल्लीच्या काळात पूर्वीप्रमाणे कोणी श्राद्धादी विधी, तसेच साधनाही करीत नसल्याने बहुतेक सर्वांनाच अतृप्त पूर्वजांच्या लिंगदेहांमुळे त्रास होतो. घरात सातत्याने भांडणे होणे, एकमेकांशी न पटणे, नोकरी न मिळणे, घरात पैसा फार काळ न टिकणे, एखाद्याला गंभीर विकार होणे, सर्व परिस्थिती अनुकूल असूनदेखील लग्न न होणे, पती-पत्नीचे न पटणे, गर्भधारणा न होणे, गर्भधारणा झाल्यास गर्भपात होणे, अपत्य जन्माला आल्यास मतीमंद किंवा विकलांग जन्माला येणे, कुटुंबातील एखाद्याला व्यसन लागणे, आदी पितृदोषाची काही लक्षणे आहेत. या लक्षणांचा विचार केला, तर हल्ली जवळपास सर्वांनाच पितृदोषाचा त्रास असल्याचे दिसून येते. त्यामुळे हा त्रास दूर व्हावा किंवा सध्या नसेल, तर भविष्यात उद्भवू नये; म्हणून श्राद्धादी विधी, तसेच 'श्री गुरुदेव दत्त', हे नामस्मरण प्रतिदिन करणे आवश्यक आहे. त्यामुळे मर्त्यलोकात अडकलेल्या पूर्वजांना गती मिळते आणि त्यांच्यामुळे होणाऱ्या त्रासांचे निवारण होते.

हिंदु धर्मात सांगितलेले आचार हे अंधश्रद्धा नसून ते शास्त्र आहे. उच्च कोटीचे विज्ञान त्यात सामावले आहे. आज आधुनिक विज्ञान कुठे Multiverse theory विषयी सांगत आहे; पण हिंदु धर्मात कित्येक शतकांपूर्वीच त्याचा उल्लेख आहे. एवढेच नाही, तर अनंत कोटी ब्रह्मांड नायकाचे गुणवर्णन, मनुष्यजन्माचे अंतिम ध्येय, लौकिक आणि पारलौकिक प्रवासात येणारे अडथळे, त्यांच्या निवारणाचे उपाय यांवर सखोल आणि परिपूर्ण मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे हिंदु तत्त्वज्ञानापुढे आधुनिक विज्ञान हे बालवाडीत असल्याप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे बालवाडीतील मुलाला पी.एच. डी. करणाऱ्याचा अभ्यासक्रम समजला नाही, तर तो पी.एच.डी. अभ्यासक्रमाचा दोष नसून बालवाडीतील विद्यार्थ्याच्या बुद्धीच्या मर्यादेचा असतो. त्याप्रमाणे आधुनिक विज्ञानाला हिंदु तत्त्वज्ञानपर्यंत पोचता येत नसेल, तर तो धर्माचा दोष नसून आधुनिक विज्ञानाची ती मर्यादा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. शास्त्रवचन हे शाश्वत आहे. त्यावर श्रद्धा ठेवली, तर मनुष्याचे कल्याण आहे. त्यामुळे श्राद्ध विषयक अपप्रचाराला बळी न पडता प्रत्येकाने यथाशक्ती श्राद्ध करावे, श्री गुरुदेव दत्त असे नामस्मरण करावे आणि साधना करून आत्मकल्याण साधावे.

संकलक : चेतन राजहंस,
राष्ट्रीय प्रवक्ता, सनातन संस्था
संपर्क क्रमांक: ७७७५८५८३८७

# बदलापुरमध्ये निरंकारी भक्तांचे रक्तदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मानवसेवेचे ब्रिद जपत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने रविवारी संत निरंकारी सत्संग भवन, बदलापुर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात 117 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. यामध्ये 97 पुरुष तर 23 महिला रक्तदात्यांचा समावेश होता.

या शिबिरामध्ये संत निरंकारी रक्तपेढी विलेपार्ले आणि जे.जे. महानगर रक्तपेढी मार्फत रक्त संकलन करण्यात आले. सेवादलाचे क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत नामस्मरण करून शिबिराला सुरवात करण्यात आली. यावेळी शिबिराला बदलापूरचे माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे यांनी सदिच्छा भेट दिली. मिशनचे स्थानिक ब्रँच मुखी माधवराव पोंदे यांच्या देखरेखीखाली स्थानिक सेवादल युनिट आणि संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांच्या सहयोगाने या शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.










**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल. ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल.तुम्ही तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल.

**कर्क**
एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल.आजचा दिवस उत्तम असेल.

**सिंह**
व्यवसायात नफा मिळविण्यासाठी तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. तसेच, आज तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल .

**कन्या**
तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल.

**तूळ**
तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.

**वृश्चिक**
व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील.

**धनु**
या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते. आज तुमचे कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल.

**मकर**
तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**कुंभ**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**मीन**
विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# वासिंद शहरात ईद निमित्त जूलूस



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : सुन्नी मुस्लिम जमात, मस्जिद ट्रस्ट वासिंद यांच्या वतीने आयोजित ईद-ए-मिलाद उन-नबी या सणा निमित्ताने येथे जूलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आज सोमवार दि.8 सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद उन-नबी या सणा निमित्ताने शहरात जूलूस रॅली काढण्यात आली होती. सदर, यामध्ये सहभागी झालेल्या मुस्लिम समाज बांधवांना नाष्टा वाटप करुन भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी आमदार दौलत दरोडा, शिवसेना ( शिंदे गट) जिल्हा प्रमुख मारुती धिर्डे, शिवसेना (उबाठा) तालुका संपर्क प्रमुख दत्ताशेठ ठाकरे, भाजप तालुकाध्यक्ष भास्कर जाधव, सरपंच राजेंद्र म्हसकर, माजी उपसरपंच विलास पाटील, रा. काँ.(श.प. गट) शहराध्यक्ष संदीप पाटील, शिवसेना (शिंदे गट) शहराध्यक्ष प्रशांत ठाकरे, भाजप शहराध्यक्ष अनिल शेलार, सामाजिक कार्यकर्ते संजय सुरळके, अनंता शेलार, गजानन पाटील, बाळू जगे, रिकी शेलार आदी राजकीय, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

यासाठी कमिटी सल्लागार अनिस सय्यद, दिलावर पठाण, इम्रान शेख, सदर शाहनवाज शेख, सचिव जावेद शेख, अकबर मनियार, मिनाज शेख, अखिल शेख, साजिद शेख, आसिफ शेख, मोहसिन शेख, अकबर शेख, जमिर सय्यद, जावेद अत्तार, अल्ताफ शेख आदी प्रमुख पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले होते. तर पोलिस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांनी सहभाग घेत व त्यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त नेमला होता.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे लोकायुक्त अभियान

**- महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : ग्रामविकास मंत्रालयाकडून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे लोकायुक्त अभियान 17 सप्टेंबर ते 31 डिसेंबर 2025 दरम्यान राबविण्यात येणार आहे. गावांचा विकास होण्याच्या दृष्टीने हे एक सकारात्मक पाऊल आहे. या अभियानात सर्व ग्रामस्थांनी मिळून एकत्रित काम केल्यास गावांचा विकास शक्य असल्याचे मत महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळा कुरुळ येथील आरसीएफ सभागृहात पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी रोहयो मंत्री भरत गोगावले,यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहीतुले, माध्यमिक शिक्षण अधिकारी महारुद्र नाळे, आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांच्यासह जिल्हा परिषद खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच उपस्थित होते. यावेळी कु.तटकरे म्हणाल्या की, ग्रामपंचायत म्हणजे राज्य व केंद्र सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचे सर्वोत्तम साधन आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सात घटकांवर आधारित आहे. सर्व ग्रामस्थांनी मिळून एकत्रित काम केल्यास गावांचा विकास शक्य आहे. गाव अधिकाधिक स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत तसेच जलसमृद्ध गाव करणे हा प्रमुख दृष्टिकोन असावा, असे आवाहनही मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

गावांचा शाश्वत व सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत योजना जनतेच्या दारी पोहोचतील. गाव सक्षम असेल तर जिल्हा सक्षम होईल, जिल्हा सक्षम झाला तर राज्य आणि राज्य सक्षम झाले ते देश सक्षम होईल. सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा, हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी केले.

या अभियानंतर्गत सात घटकांवर काम करायच आहे. लोकाभिमुख प्रशासन तयार करायचे आहे. जिल्ह्यातील 507 ग्रामपंचायतींच्या नावे सेतू केंद्र असून, जनतेला आवश्यक असलेले दाखले ग्रामपंचायत मधून मिळत आहेत. प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत किमान एक हेक्टर जागेवर बांबू लागवड करण्यात येत आहे. यामधून ग्रामपंचायतींना आर्थिक उत्पन्न मिळेल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

ग्राम समृद्ध करण्यासाठी अभियानांतर्गत सर्वांनी प्रयत्न करावेत. अभियानांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद यामध्ये एक स्पर्धा आहे. अभियानामुळे योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येईल. सर्वांना हे अभियान आपले वाटावे असे काम करून अभियानात जनतेचा सहभाग मिळवावा, असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान उत्तमप्रकारे कसे राबविण्यात यावे याबाबत यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांना मार्गदर्शन केले. अनेक सरपंच व अधिकारी यांच्यासोबत चर्चा केल्यानंतर हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मल्लिनाथ कलशेट्टी स्पष्ट केले.

## उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

**शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय**

**ई - निविदा क्र. २२४ ते २३० (२०२५-२६)**

उल्हासनगर महानगरपालिका शहरामधील खालील नमुद कामे योग्य वर्गातील ठेकेदाराकडून निविदा प्रणाली पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक ०९/०९/२०२५ रोजी निविदा मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**ई- निविदा क्र. २२४ ते २३० (२०२५-२६)**

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमपा/ साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२२४ | उल्हासनगर-५ हद्दीतील प्रभाग क्र.१९ मधील काजल जी यांच्या घरापासून ते नथ्थाजी जी घरापर्यंत सी.सी. पॅसेज व ड्रेनेज लाईन बनविणे | ८४७४५८ | १०००० | ३ महिने | NA |
| २ | उमपा/साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२२५ | उल्हासनगर-५ हद्दीतील प्रभाग क्र.१९ मधील बॅरेक नं.१९०३ येथे एमएमआरडीए शौचालय परिसरात सीसी पॅसेज व ड्रेनेज लाईन बनविणे | ८४७४५८ | १०००० | ३ महिने | NA |
| ३ | उमपा/साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२२६ | उल्हासनगर प्रभाग समिती क्र.२ मधील विविध ठिकाणी शौचालयाची दुरुस्ती करणे | १६९८३३६ | १७००० | ९० दिवस | NA |
| ४ | उमपा/साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२२७ | उल्हासनगर प्रभाग समिती क्र.१ मधील विविध ठिकाणी शौचालयाची दुरुस्ती करणे | १६९८३३६ | १७००० | ९० दिवस | NA |
| ५ | उमपा/साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२२८ | उल्हासनगर प्रभाग समिती क्र.३ मधील विविध ठिकाणी शौचालयाची दुरुस्ती करणे | १६९८३३६ | १७००० | ९० दिवस | NA |
| ६ | उमपा/साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२२९ | उल्हासनगर प्रभाग समिती क्र.४ मधील विविध ठिकाणी शौचालयाची दुरुस्ती करणे | ३९१००० | ३९१० | ९० दिवस | NA |
| ७ | उमपा/साबांवि/ नोटीस / २०२५-२६/२३० | उल्हासनगर-३ मधील रेणुका सोसायटी आशिर्वाद सोसायटी येथे कोसळलेल्या नाल्याची संरक्षण भिंत बनविणे | ८४७४५८ | १०००० | ३ महिने | NA |


सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र. उमपा/पीआरओ/२८९/२०२५
दिनांक : ०८/९/२०२५

**सही /-**
**कार्यकारी अभियंता (साबांवि)**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# फ्राईड राईसमध्ये आढळले झुरळ

**कल्याणातील रामदेव हॉटेलमध्ये निष्काळजीपणाचा कळस**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील प्रसिद्ध रामदेव हॉटेल पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. काही दिवसांपूर्वी एका ग्राहकाच्या जेवणामध्ये लोखंडाचा तुकडा आढळल्याची घटना ताजी असतानाच, आता पुन्हा एकदा फ्राईड राईसमध्ये झुरळ आढळल्याने ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तर याबाबत हॉटेल व्यवस्थापनाने हे आरोप फेटाळून लावत या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचे सांगितले.मुंबई महापालिकेत नोकरी करीत असलेल्या निकिता जाधव या कल्याणच्या रामदेव हॉटेलमध्ये रविवारी पार्सल फ्राईड राईस घ्यायला गेल होत्या. पार्सल घेऊन निकिता या घरी गेल्या, घरी त्यांची मुलगी फ्राईड राईस खात असताना त्यामध्ये झुरळ आढळले. या घटनेची दखल घेत निकिता जाधव यांनी हाँटेल येथे जाऊन पार्सल मधील डब्यातील फ्राईड राईस मधील झुरळ दाखविले असता व्यवस्थापनाने चेंज करून देतो असे उत्तर दिले. ज्या विश्वासाने आम्ही या हाँटेल मध्ये येतो त्याला तडा बसला आहे, या निष्काळजीप्रकरणी आपण तक्रार करणार असल्याचे जाधव यांनी प्रसिद्धी माध्यामांना सांगितले. या घटनेने अन्न आषधे विभागाकडून काय कारवाई केली जाते, असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

तर महिला ग्राहकाच्या आरोपावर हॉटेल प्रशासनाने स्पष्टीकरण दिले आहे. या महिलेनी संध्याकाळी साडेसात वाजता पार्सल नेले त्यानंतर साडेनऊ नंतर त्या हॉटेलमध्ये आल्या. यादरम्यान हे पार्सल कुठे होते ते आम्हाला नाही माहिती. गेल्या 28 वर्षांपासून हे हॉटेल कल्याणमध्ये असून जेवण बनवताना हॉटेलमध्ये योग्य स्वच्छता राखली जाते. या घटनेची चौकशी केली जाईल असे हॉटेल व्यवस्थापनाने सांगितले.

# जुन्नरमध्ये तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे प्रस्थान







दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : १२ व्या शतकापासून सुरू असलेली परंपरा जपणाऱ्या तुळजापूरच्या भवानी मातेच्या पलंगाचे जुन्नर येथून तुळजापूरकडे प्रस्थान मोठ्या भक्तिभावाने पार पडले. जुन्नरमधील तिळवण तेली समाजाच्या कार्यालयापासून प्रारंभ झालेल्या या सोहळ्यात भाविकांनी देवीचा पलंग डोक्यावर व हातावर उचलून घेत मिरवणुकीने दर्शनाचा लाभ घेतला.

पलंगाचा भाद्रपद पंचमीला (दि. २८ ऑगस्ट) घोडेगाव येथून जुन्नर येथे आगमन झाले होते. पुढील दिवशी (दि. २९ ऑगस्ट) देवीच्या गादीची स्थापना करण्यात आली. घोडेगाव ते तुळजापूर या पायी प्रवास मार्गात फक्त जुन्नर येथे १० दिवस पलंगाचा मुक्काम असतो. या औचित्याने भागवत कथा, पूजा, आरती आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.प्रस्थानाच्या दिवशी जुन्नरमधील हांडे देशमुख व बुट्टे पाटील कुटुंबीयांच्या घरासमोर प्रथम पलंग दर्शनासाठी नेण्यात आला. त्यानंतर संपूर्ण शहरातील नागरिकांच्या घरी घेऊन जाऊन देवीच्या दर्शनाचा लाभ सर्वांना मिळावा यासाठी मिरवणुकीचे आयोजन झाले. नागरिकांनी रस्त्यावर नवीन पायघड्या अंथरून देवीच्या स्वागताची तयारी केली होती. पूर्ण शहरातून पलंगाची मिरवणूक काढण्यात आली आणि भक्तिभावाने जयघोष करण्यात आला.

या सोहळ्याला तिळवण तेली समाज कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष कैलास गरीबे, उपाध्यक्ष प्रशांत फल्ले, सचिव राजेंद्र खेत्री, तसेच अनिल करडीले, राजेंद्र कर्पे, मिलिंद झगडे, डॉ. सागर शिंदे, सुरज शेलार, महेश घोडेकर, माजी नगरसेवक अविनाश करडीले, भानुदास खोंड, दत्ता करडीले, रामदास फल्ले, जयप्रकाश फल्ले, महेश गरीबे आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते व भाविक उपस्थित होते.

# दिव्यामध्ये सदगुरू नगर आणि शीळ रोडवरील ०५ अनधिकृत इमारतींवर कारवाई



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दिवा प्रभाग समिती क्षेत्रात, अनधिकृतपणे बांधण्यात येत असलेल्या पाच इमारतींवर ठाणे महापालिकेने सोमवारी कारवाई केली. या अर्धव्याप्त, व्यावसायिक व निवासी इमारती रिक्त करून त्या पूर्णपणे जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील बी. आर. नगर येथील दोन इमारती, सदगुरु नगर मधील २ इमारती आणि दिवा-शीळ रोड येथील १ इमारत अशा एकूण पाच इमारतींवर पोकलेन मशीनचे सहाय्याने कारवाई करण्यात आली. या पाचही इमारती तळ अधिक एक मजल्याच्या होत्या.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे, महापालिकेने अनधिकृत बांधकामांवरील कारवाई पुन्हा सुरू करण्यात आली आहे. निवासी तसेच व्यावसायिक स्वरूपाच्या अनधिकृत बांधकामांवरील कारवाई नियमित सुरू राहणार आहे.

सोमवारी, दिवा प्रभाग समिती क्षेत्रात झालेल्या कारवाई प्रसंगी, उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त शंकर पाटोळे, उपायुक्त सचिन सांगळे, सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे, सहाय्यक आयुक्त गणेश चौधरी, सहाय्यक आयुक्त ललिता जाधव, सहाय्यक आयुक्त बाळू पिचड उपस्थित होते. अतिक्रमण विभाग आणि प्रभाग समिती येथील कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

# सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे जनजागृती रॅली





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : मा. प्रशासक तथा आयुक्त श्रीमती मनीषा अव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या संकल्पनेतून तसेच मा. अतिरिक्त आयुक्त (१) डॉ. किशोर गवस आणि मा. उपायुक्त (आरोग्य) श्रीमती विशाखा मोटघरे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. मनीष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे आणि मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार यांनी पुढाकार घेतला व उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत नियुक्त ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट आणि ओरियन कन्स्ट्रक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबविण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत सेवासदन महाविद्यालयाच्या एन.एस.एस. युनिटतर्फे व महिला बचत गटांच्या सहकार्याने आज सेवासदन महाविद्यालयापासून नेहरू चौकापर्यत भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीमध्ये विद्यार्थी, महिला बचत गटाच्या कार्यकर्त्या तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅलीदरम्यान आकर्षक फलक, घोषवाक्ये आणि जनजागृती संदेशांद्वारे प्लास्टिकबंदी, स्त्रोतस्तरीय कचरा विभाजन आणि स्वच्छतेचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवण्यात आले.



# दीघाशी येथील गो-पालक संतोष पाटील 'गौरक्षा रत्न' पुरस्काराने सन्मानित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील दिघाशी येथील गो-पालक संतोष पाटील यांना गो-मातांची रक्षा आणि या क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना जगतगुरु शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांच्या हस्ते "गौरक्षा रत्न" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. संतोष पाटील हे गेल्या दहा वर्षांपासून गो-सेवा करत आहेत.आणि भिवंडी, वाडा तालुक्यातील ग्रामीण भागात विविध ठिकाणी स्वखर्चाने शिबिरे घेऊन मानवी जीवनात गो-मातेचे किती महत्व आहे हे पटवून देत आहेत. त्याचप्रमाणे गोमय, गोमूत्र, दूध,दही, तूप यापासून विविध प्रकारचे औषधे बनवीत आहेत.त्यांच्या या विशिष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना मुंबई येथील एका गोयज्ञ सोहळ्यात "गौरक्षा रत्न" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन गो-सेविका डॉ.वैदही तामनजी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रातील विविध भागांतील गो-सेवकांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.



# पेण पोलिसांकडून बेपत्ता मुलगा वडिलांच्या स्वाधीन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील पाटणोली येथून अकरा वर्षे मुलगा बेपत्ता झाल्याने त्याचा गेली चार-पाच दिवस पेण पोलिसांनी शोध घेतला असता तर योग्य ठिकाणी मिळाल्याने पोलिसांनी मुलाला वडिलांच्या स्वाधीन केला आहे.

नमूद पालकाचा शोध होणे कामी पेण उपविभागीय पोलीस अधिकारी नालकुल यांच्या आदेशाने व पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचे तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक श्री. रसाळ व पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी वरिष्ठांच्या आदेशाने सदर बालकाचा तपास होण्याकरिता वेगवेगळया गावातील सोशल मीडियावरील ग्रुप वर माहिती प्रसारित करून तसेच स्थानिक पत्रकार बंधू यांनी वृत्तपत्र व विविध माध्यमातून पळून नेलेल्या बालकाचा शोध घेण्यासाठी कशाशीने प्रयत्न केल्याने नमूद बालक मुंबई येथे रेल्वे स्टेशनवर फिरताना मिळून आल्याने त्यास त् CR NO 165/2025 BNS 137(2) मधील अप्रहुत मुलगा मिळून आला असून त्यास जबाब नोंदवून त्याचे वडिलांच्या ताब्यात दिले आहे.

# पत्रकार उत्कर्ष समितीतर्फे आरोग्य शिबीर संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्रच्या वतीने नवी मुंबई उलवे नोडच्या गव्हाण येथे स्मित क्लिनिक येथे ७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि औषोधपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्वरोग निदान शिबिरात सांधेदुखी, संधिवात, वाताचे आजार, मधुमेह, मुतखडा ,लहान मुलांचे आजार, स्त्रियांचे आजार, पाळीचे आजार, केस गळणे, रक्त तपासणी, इसीजी आदी तपासण्या करण्यात आल्या. पत्रकार उत्कर्ष समिती दरवर्षी वृक्षारोपण, नवदुर्गा सन्मान, गुणवंतांचा गौरव, विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप आदी उपक्रम राबवतात. गव्हाण उलवे परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाज जागृती व प्रबोधन करणाऱ्या समाजसेवकांचा सन्मान करण्यात आला यामध्ये निसर्गप्रेमी व समाजसेवक डॉक्टर हरीश पाटील, कीर्तनातून प्रबोधन करणारे ह भ प शरद महाराज सावळाराम कोळी, गायक राजकिरण कोळी व गायिका कल्याणी कोळी, डॉक्टर पूजा खारपाटील यांना गौरव चिन्ह व गौरव पत्र देऊन गौरविण्यात आले.सदर शिबिराचा लाभ शंभरहून अधिक रुग्णांनी घेतला. स्मित क्लिनिकचे डॉ . कुणाल म्हात्रे यांनी रुग्णांची तपासणी केली. या आरोग्य शिबिरासाठी पॅनेसिया हॉस्पिटलचे शरद गुप्ता, संजय तांडेल यांच्या सह डॉक्टर व नर्सिंग स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी पत्रकार उत्कर्ष समिती चे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ अशोक म्हात्रे, सचिव डॉ वैभव पाटील , सह सचिव ज्ञानेश्वर कोळी , खजिनदार शैलेश ठाकूर, रायगड जिल्हाध्यक्ष मिलिंद खारपाटील ,उरण तालुका कार्याध्यक्ष सचिन घबाडी , महिला उत्कर्ष समिती प्रदेश सचिव ॲड. दिव्या लोकरे, नवी मुंबई कार्याध्यक्ष वर्षा लोकरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. पत्रकार उत्कर्ष समिती च्या या समाजोपयोगी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भिवंडीत ईद मिरवणूकीत हजारो मुस्लिम बांधव सहभागी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ईद ए मिलाद मिलाद निमित्ताने भिवंडी शहरात रजा अकादमीच्यावतीने दरवर्षी भव्य मिरवणूक काढण्यात येते यंदा सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन सोहळा बंदोबस्त असल्याने पोलिसांनी सदर मिरवणूक 8 सप्टेंबर रोजी काढण्यात यावी अशी विनंती पोलीस दलाच्यावतीने करण्यात आली होती त्यामुळे समजदार भूमिका घेत ही मिरवणूक पुढे 8 सप्टेंबर रोजी सोमवारी काढण्यात येईल अशी घोषणा मुस्लिम समाज बांधवांनी घेतली होती त्यानुसार आज दुपारी भिवंडी शहरात ईद ए मिलाद निमित्ताने मुस्लिम समाज बांधवांनी भव्य मिरवणूक काढुन इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नावाचा जय जयकार करून सामुहीकरीत्या मशिदीत नमाज अदा केली.नारे तकदीर अल्ला हो अकबर अशा गगनभेदी घोषणा देत निघालेल्या मिरवणूकीत हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.सामाजिक संस्था पदाधिकारी व मुस्लिम बांधवांनी पुष्पगुच्छ देत त्यांचे स्वागत केले. यावेळी अनुचित प्रकार घडु नये यासाठी
ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी पोलीस उपआयुक्त शशिकांत



बोराटे यांचा उपस्थितीत विशेष पोलीस बंदोबस्त तैणात केला होता.निघालेल्या या मिरवणुकीत शांतता समिती सदस्यासह खासदार सुरेश म्हात्रे, आमदार रईस शेख, काँग्रेसपक्षाचे माजी आमदार रशिद ताहीर मोमीन, रूपेश म्हात्रे, माजी उपमहापौर इमरान खान, तारीक फारूकी, दिन मोहम्मद खान, आरशी आझमी, इकबाल सिद्धीकी, अनस अन्सारी, आरपीआय शहर अध्यक्ष महेंद्र गायकवाड, यांच्यासह सह विविध पक्षाचे नगरसेवक व शांतता समीती सदस्य पदाधिकारी सहभागी झाले होते.ईद ए मिलाद हा इस्लाम धर्माचे धर्मगुरू मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिवस असल्याने भिवंडी शहर परिसरात असलेल्या मशिदी मध्ये नमाजा सह विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.शहरातील कोटरगेट येथील मशिदीला आकर्षक विद्युत रोषनाई करून सजविण्यात आले होते. त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.आज दुपारी 3 : 15 वा. रजा अँकडमीचेवतीने कोटरगेट मशिद येथे फुल व विद्युत रोषनाईने सजविलेल्या घोडागाडीत विराजमान मौलाना यांना रजा अँकेडमीचावतीने पुष्पहार घालुन त्यांचे स्वागत केले.त्या नंतर पै.मोहम्मद यांचे जयजयकाराचे घोषणा देत मिरवणूकीस सुरुवात झाली.निजामपूर येथे मिरवणूकीत सहभागी झालेल्या नागरीकांना सरबत-पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.चाँदतारा असलेले हिरवे झेंडे घेऊन बेफामपणे नाचत मुस्लिम बांधव आपला आनंद साजरा करत होते.वंजारपाटी नाका चौकात मुस्लिम बांधवांचे पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.सदर मिरवणूक कोटरगेट, चाँदतारा, निजामपुरा, पटेल मोहल्ला, वंजारपट्‍ी नाका चौक.नाशिक रोड मार्गी निघालेली मिरवणूक चाविंद्रा मिल्लतनगर मामा भांजा दरगाह येथे सायंकाळी 7 वा.संपन्न झाली.यावेळी भिवंडी कलाम उड्डाणपूलावर सुध्दा मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. त्यामुळे सर्वत्र विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

# मानवी जीवनाच्या कल्याणासाठी संतांचे कार्य - डॉ. सुनीलदत्त गवरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पूर्णा : मानवी जीवनाचे कल्याण व्हावे यासाठीच महाराष्ट्रातील संतांनी कार्य केले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनीलदत्त गवरे यांनी केले.ते येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयातील तत्वज्ञान विभागाच्या वतीने संत ज्ञानेश्वर यांच्या ७५० व्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित संतांचे तत्त्वज्ञान या विषयावरील एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्‍घाटनप्रसंगी बोलत होते.

या राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उदघाटन सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष कुन्हे होते तर बिजभाषक म्हणून वाशीम येथील प्रा. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य तथा महाविद्यालयातील गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरेखा भोसले, सिनेट सदस्य प्रा. डॉ. विजय भोपाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. भिमराव मानकरे आदी मान्यवर यावेळी मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. डॉ. गवरे म्हणाले की,



प्रत्येक माणसाने स्वतः मधला अहंकार गाळून मानव सेवा केली पाहिजे. यातच खरी ईश्वर भक्ती असून ईश्वर भक्तीमुळे सर्वांचे भले व्हावे यातच माझे भले आहे. हा विचार खऱ्या अर्थाने संतांनी दिला असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

या चर्चासत्राच्या बीजभाषणात प्रा. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी संत साहित्यांचा इतिहास सांगून मानवी जीवनाच्या कल्याणासाठी संताचे अध्यात्मिक विचार कसे महत्त्वाचे आहेत यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. या राज्यस्तरीय चर्चासत्राचे संयोजक प्रा. डॉ. प्रभाकर कीर्तनकार यांनी आपल्या प्रास्ताविकात राज्यस्तरीय चर्चासत्राची भूमिका आणि तत्वज्ञान विषयाचे महत्व यावर सविस्तर असे भाष्य केले.

या चर्चासत्राच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या भित्तिपत्रकाचे विमोचन उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील पदवी संपादन करून तत्वज्ञान विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या निकिता पानोडे व प्रतिक्षा नडसकर या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या चर्चासत्राच्या उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्धीविभाग प्रमुख प्रोफेसर प्रा.डॉ.संजय कसाब यांनी केले तर आभार प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी यांनी मानले.या चर्चासत्रासाठी विविध महाविद्यालयातून प्राध्यापक , विद्यार्थी, तत्वज्ञान विषयाचे विभागप्रमुख व तत्वज्ञानाचे अभ्यासक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संस्थापक सचिव डॉ. रामेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक तत्वज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभाकर कीर्तनकार व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. भीमराव मानकरे, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.

# कल्याण एसटी आगारातील बसेसच्या अपघाताचे सत्र सुरूच

## स्टिअरिंग रॉड तुटल्याने एसटी बस झाडावर आदळली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण एसटी आगाराच्या बसेसच्या अपघातांचे सत्र काही केल्या थांबण्याचे नाव घेत नाहीये. बसचे पुढचे चाक निखळून झालेल्या अपघाताला काही आठवडे उलटत नाहीत तोच आज सकाळी पुन्हा एकदा बसचा स्टेअरिंग रॉड तुटून अपघाता झाला. यावेळीही बस झाडाला धडकल्याने सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला तरी एसटी प्रशासन मोठ्या जीवघेण्या अपघाताची वाट पाहत आहे का असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

**५-६ प्रवासी किरकोळ जखमी तर वाहकाला मुकामार**

काल सकाळी कल्याण आगाराची ही बस सुमारे 20- 25 प्रवाशांना घेऊन माळशेज मार्गे आळेफाटा येथे निघाली होती. मात्र मुरबाडच्या पुढे असलेल्या गावाजवळून ही बस जात असताना अचानक बसच्या स्टेअरिंगचा रॉड तुटल्याने ही बस थोडी पुढे जाऊन रस्त्यावरून खाली उतरली. आणि रस्त्याशेजारी झुडपांमध्ये असलेल्या झाडाला या बसने धडक दिली. ज्यामध्ये बसच्या उजव्या भागाचे काही नुकसान झाले आणि बसमधील काही प्रवाशांना किरकोळ मार लागल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तर वाहकालाही मुकामार लागल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र सुदैवाने ही बस झाडाला धडकल्याने पुन्हा एकदा मोठा अपघात टळला. काही अंतरावर पुढे असलेल्या माळशेज घाटामध्ये हा अपघात घडला असता तर मग काहीही होऊ शकले असते. तर या अपघाताबाबत कल्याण एसटी आगाराचे व्यवस्थापक महेश भोये यांच्याशी मोबाइलद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तो होऊ शकला नाही.

दरम्यान काही आठवड्यांपूर्वीही कल्याण एसटी आगाराच्या बसचे पुढचे चाक निखळून अपघाता झाला होता. त्यापाठोपाठ आता आज स्टेअरिंग रॉड तुटून झालेला अपघाताचा विचार करता कल्याण आगारातील बसेसच्या देभभाल दुरुस्तीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. देखभाल दुरुस्तीचे काम करूनही असे अपघात होत का आहेत ? की बसेसच्या देखभाल दुरुस्ती कामामध्ये काही तडजोड केली जात आहे का? आणखी किती मोठा अपघात झाल्यावर की प्रवाशांचा बळी गेल्यावर एसटी प्रशासन जागे होणार आहे असे असंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांकात बदल



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे यांच्या दूरध्वनी (लँडलाईन) क्रमांकामध्ये बदल करण्यात आला आहे. सर्व संबंधित व्यक्तींनी याची नोंद घ्यावी. या कार्यालयाचा जुना दूरध्वनी क्रमांक ०२२-२५३४३१७४ रद्द करण्यात आला असून, त्याऐवजी आता ०२२-४५६४१५९३ हा नवीन क्रमांक सुरू झाला आहे.पुढील सर्व कामकाजासाठी या नवीन क्रमांकाचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी (निवृत्त) मेजर प्रांजल जाधव यांनी दिली आहे.



# कल्याणच्या सुभेदार वाडा शाळेत भक्तिसंगीताचा कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण : गुरुवार दिनांक 4 /9 2025 रोजी सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा कल्याण येथे प्राथमिक शाळा सुभेदार वाडा या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मिळून भक्तिसंगीत चा कार्यक्रम अतिशय उत्तररित्या सादर केला.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संस्थेचे कार्यवाह विकास पाटील सर यांनी भूषविले व शिवाजी शिंदे (बालनाट्य रंगभूमी अध्यक्ष)यांनी प्रमुख पाहुणे यांचे स्थान भूषविले कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ▪ नवी मुंबई ▪ ठाणे ▪ पालघर ▪ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# रस्त्यांवरील खड्ड्यांची चौकशी करा

## : राष्ट्रवादीची मागणी

**राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आणि स्थानिक प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे महाराष्ट्रभर गणपती बाप्पाचे आगमन व निरोपाचा प्रवास खड्डयांच्या रस्त्यांवरून झाल्याने याची चौकशी राज्य सरकार व विधानसभा अंदाज समिती कडून करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

राज्य शासन आणि स्थानिक महानगरपालिका प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रासहीत संपूर्ण ठाणे जिल्हा आणि बहुतेक महाराष्ट्रभर गणपती बाप्पाच्या आगमनावेळी आणि निरोपाच्या वेळी बहुतेक ठिकाणी बाप्पांच्या विसर्जनावेळी भक्तांना रस्त्यांवर खड्डे बघण्यास मिळाले. हीच अवस्था सण साजरा करण्यासाठी गावी गेलेल्या लोकांची होती. त्यांनाही खड्डयांच्या रस्त्यांवरून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागला. जनतेच्या करोडो रूपयांची उधळपट्टी करून सर्वत्र निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने रस्त्यांची खराब अवस्था झाली आहे.

याची दखल राज्य सरकारने घेतली पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम विभागात आणि महानगरपालिका प्रशासनात रस्त्यांच्या कामात झालेल्या भ्रष्टाचारामुळे रस्त्यांची अशी दुर्दशा झालेली दिसून येत आहे. आजपर्यंत महाराष्ट्र विधानसभा अंदाज समितीने या विषयाकडे लक्ष दिलेले दिसत नाही. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा अंदाज समितीने सार्वजनिक बांधकाम विभागात आणि महानगरपालिका प्रशासनाच्या रसत्यांच्या व इतर कामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषी आढळणारे ठेकेदारांना काळया यादीत टाकावेत तसेच दोषी अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याची मागणी नोवेल साळवे यांनी केली आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024